करोना २०२०/सूचनां/आदेश क्र. २५८

# महाराष्ट्र शासन
## जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय रायगड-अलिबाग

दुरध्वनी क्रमांक :- ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२००१ फॅक्स क्रमांक: ०२१४१-२२२०२५/२२७४५१
Email :collector_raigad@maharshtra.gov.in Email dcraigad@gmail.com

---

क्र.साशा/कार्या-१/ब-५/आ.व्य./करोना विषाणू/प्रतिबंधात्मक उपाय योजना/२०२० दि.२९/०४/२०२०

---

**वाचले**:- १) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम-२००५.
२) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिसूचनां क्र.करोना २०२०/ प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१३/०३/२०२०.
३) महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील साथरोग अधिनियम, १८९७ ची नियमावली दि.१४/०३/२०२०.
४) साथ रोग अधिनियम १८९७.
५) या कार्यालयाकडील आदेश क्र.साशा/कार्या-१/ब-५/आ.व्य./करोना विषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/२०२० दि.१७/०४/२०२० **(करोना२०२०/सूचनां/आदेश क्र.२४१)**
६) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्याकडील अधिसूचना क्र.DMU/२०२०/CR.९२/DisM-१, Dated :-१७ April २०२०
७) सह.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांजकडील पत्र दि. ०८/०४/२०२०

---

**आदेश,**

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

करोना विषाणूचा (COVID-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाने राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३/०३/२०२० लागू करण्यात आलेला आहे. त्याबाबतची उपोद्घातातील अ.क्र.२ कडील अधिसूचनां लागू करण्यात आलेली आहे.

उपोद्घात क्र.५ अन्वये, करोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून औद्योगिक, खाजगी आस्थापनांमधील होणारी गर्दी टाळणे आवश्यक असल्याने रायगड जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील सर्व प्रकारचे उद्योग व त्यांच्या आस्थापना, आय.टी. व सॉफ्टवेअर कंपन्या, तसेच त्यांना सेवा पुरविणाऱ्या आस्थापना दिनांक ०३ मे, २०२० पर्यंत पुर्णपणे बंद करण्यात आलेल्या आहेत.

आणि ज्या अर्थी उपोद्घातातील क्र. ७ अन्वये सह.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी मुंबई पुणे मिसींग लिंक प्रकल्पासाठी मे.नवयुग इंजिनिअरींग कंपनी लि. व मे.ॲफकॉन इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांचेमार्फत मान्सूनपूर्व स्वरुपाची कामे सुरु ठेवणेबाबत या कार्यालयास कळविले आहे.

उपोद्घातातील ६ मधील परिच्छेद १६ मधील (iv) नुसार मान्सूनपूर्व कामे पुर्ण करण्यासाठी सूट ठेवण्यात आलेली आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्यातील मुंबई पुणे मिसींग लिंक प्रकल्पासाठी मे.नवयुग इंजिनिअरींग

कंपनी लि. व मे.ॲफकॉन इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांचेमार्फत काम चालू ठेवण्याची परवानगी खालील अटीस अधिन राहून देण्यात येत आहे.

१) कामगाराने मास्क परिधान करणे, २) सॅनिटायझरचा वापर करणे, ३) हॅण्ड वॉशने हात धुणे ४) सामाजिक अंतर ठेवणे ५) कंत्राटदारामार्फत कामगारांसाठी हॅण्डवॉश साबण, सॅनिटायझर व मास्क इत्यादी सुविधा पुरविणे व आरोग्य तपासणी करत राहणे.

(निधी चौधरी)
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**रायगड-अलिबाग**

**प्रत :-** सह.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मुंबई.

